


म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १६०८

REFBK-0013475
REFBK-0013475

# अभिसार

ना० घ० देशपांडे

मौज प्रकाशन
मुंबई ४

# अभिसार

ना० घ० देशपांडे

REFBK-0013475
REFBK-0013475

मौज प्रकाशन
मुंबई ४

मौज प्रकाशन : ८८

पहिली आवृत्ति : २८ सप्टेंबर १९६३

© १९६३, ना० घ० देशपांडे

किंमत चार रुपये

मुखपृष्ठावरील चित्र :
बाळ ठाकूर

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

# अनुक्रम


'शीळ'नंतरच्या कविता

| | |
|---|---|
| अभिसार | १ |
| वादळवारा | ३ |
| कळलें नाही की | ४ |
| प्रेरणा | ६ |
| तेथून | ७ |
| कळ्या-फुलें ने हीं सगळीं पण | १० |
| माझ्या या मनांत | ११ |
| आठवण | १२ |
| हाक | १३ |
| कल्पना | १४ |
| इथेच कुठे तरी | १५ |
| बकुलफुला | १८ |
| भिरभिर लहरी | १९ |
| उघड नयन | २० |
| दर्शन | २१ |
| निबिड निशे, ये ! | २२ |
| या गवतावर | २३ |
| आरती | २५ |
| वाटेच्या वाटसरा | २९ |
| प्रत्यय | ३१ |
| डं चिक डं | ३२ |
| हिरण्यगर्भ | ३३ |
| वाकडीतिकडी रेघ | ३४ |
| एकटा पांथ मी | ३६ |
| गर्जत आहे गोंधळ त्याचा | ३७ |

| | |
|---|---|
| सारें कांही विसरून | ३८ |
| संकेत विसरून | ३९ |
| उगीच कांही | ४० |
| तिकिटाशिवाय | ४१ |
| मलाहि कुणी नाही | ४२ |
| अपुरी झोप | ४३ |
| मला जगायचें आहे | ४४ |
| अथांग पाणी | ४५ |
| अदृश्य कुणी तरी | ४६ |
| श्रावण | ४७ |
| पुढेच्च हो | ४८ |
| माझ्या मनांतली व्यथा | ४९ |
| छाया धरून उराशीं | ५१ |
| 'कांही नाही, कांही नाही' | ५३ |
| अटळ या कड्यापाशी | ५६ |
| उभा अंधार शरमला | ५७ |
| धुक्यावर भरलेली | ५८ |
| म्हातारा एक | ५९ |
| हवा हिरमुसलेली | ६० |
| दुपारीं | ६२ |
| मुखवटा | ६३ |
| रवींद्र : तुझें असें कांही तरी | ६४ |
| रवींद्रास | ६५ |
| रवींद्रगीत | ६६ |
| अंधारांत होती गात रातराणी | ६७ |
| लाटा : सगळ्यांचें गाणें | ६८ |

चेंडू ६९
अर्थ टाळून ७०
पदर ७२
बोलत आहे साप ७४
अतृप्त अधरांची कुजबुज ७५
रानमळ्यांत रानमळ्यांत ७६
सामान्य माणूस ७८
मुकाट मालतीचें श्वसन ८०

## ‘शीळ’ पूर्वीच्या कविता

दिवेलागण ८३
वनगीत ८४
ही ८५
आस ८६
केतकीचें पान ८७
वनराणी ८८
सोहळा ८९
तर बांध ना कटिबंध तूं ९०
काळजी जीवाला वाटते ९१
पिर्तीच्या फिरल्या नजरा ९२
हें काय, गडे ! ९३
म्हणत म्हणत मधुगीत ९४
शोध ९५
तुला मला, ग ऽ, तुला मला ! ९६
विरहगीत ९७
साजणी ग ऽ ! ९८

| | |
|---|---|
| तिचा प्रश्न | ९९ |
| निःशंक झोप घे तूं | १०० |
| कधी | १०१ |
| जुनी प्रीत | १०२ |
| सहज भरेल फुलारी | १०४ |
| जरा धीर धर | १०५ |
| तुझ्याच साठी | १०६ |
| प्रेम व चुकी | १०७ |
| देव तुझामाझा | १०८ |
| प्रतीक्षा | १०९ |
| कधी तरी | ११० |
| अनन्यगतिका | १११ |
| प्रेमाचें तत्त्वज्ञान | ११२ |
| आर्यांचें गाणें | ११३ |
| तर | ११४ |
| सखे गऽ ! | ११६ |
| आज एकादशी | ११७ |
| विसर विसर हृदया | ११८ |
| असा जिवाचा जिवलग तूं | ११९ |
| महात्मा | १२० |
| शशिवदने | १२१ |
| धीवरी | १२२ |
| येथे | १२३ |
| जग हसलें रे ! | १२४ |
| डाव | १२६ |

# 'शीळ'नंतरच्या कविता

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...३६२६९... वि: ...काव्य...
क्रमांक ...१२०८... नों. दि ...८।४।६८.

# अभिसार

तम चढत आहे ;
पान झडत आहे ;
कुणी करत आहे
मधुर अभिसार.

कुणी दिसत नाही ;
आहे एकटी, बाई,
उभी हिरवी जाई
घेऊन फुलहार !

१३४६५

सळसळले वारे ;
लुकलुकले तारे ;
तरु झिंगले सारे
होऊन अनिवार.

रात्र वाजते किर्र :
नाही कुणीच जागें ;
ऊर उडतो : कशी
पाहूं वळून मागे ?

झालें, लागून छंद,
विश्वहृदय धुंद ;
सारा क्षितिजगोल
झाला अदृश्य कुंद.

बाई, वरून नभ
मुकी लावून दिठी
घाली धरेला मिठी
हळूच हळुवार !

## वादळवारा

आज कुणाला धुंडत आहे वादळवारा ?

विचलित झालें, बघ, याचें मन ;
भटकत फिरतो हा रानोवन
व्याकुळतेने उधळत भवती सर्व पसारा :
आज कुणाला धुंडत आहे वादळवारा ?

भटकत घन गगनें गडगडलीं ;
वीज ढगामधली कडकडली ;
अवखळ गति पण याची चढली धुंद भरारा :
आज कुणाला धुंडत आहे वादळवारा ?

पळभर मग तिमिराला उजळत
आल्या झळकत वाजत गाजत
तरुपर्णांवर थयथय नाचत या जळधारा :
आज कुणाला धुंडत आहे वादळवारा ?

## कळलें नाही की

एकदा एकला निर्जन वनांत
बसला तपस्वी करीत तपस्या
एकदा शेवटीं सुटावी म्हणून
कुटिल जटिल जीवनसमस्या.

बसला मांडून आसन सारखें
निर्मळ करीत मानस गढूळ :
इतके दिवस निघून गेले की
यतीच्या भोवती वाढलें वारूळ.

शरीर दंडीत खंडीत बसला ;
उरली नव्हती कांहीच वासना.
विश्वाचें रहस्य धुंडीत असतां
विश्वाची नव्हती उरली कल्पना.

एकदा परंतु दिसलें बाहेर
सुंदर, मोहक, मादक, साकार :
उठला टाकून तपस्या सगळी :
नव्हता उरला आंतच नकार.

नव्हती सारिका ; नव्हती तारका ;
ती मनहारिका मेनका नव्हती ;
ती तर सोज्ज्वळ, सुंदर शलाका
होती त्या आंतल्या ज्योतीच्या भवती.

म्हणालें जग की चळलें वर्तन,
घडलें पतन यतीच्या नीतीचें ;
कळलें नाही की तें होतें नर्तन
आंतल्या उज्ज्वल अमर ज्योतीचें.

# प्रेरणा

शृंगार करून चालली होती जी
सुगंधी आतूर निःश्वास टाकत
मधुर स्वप्नाळू नयन झाकत
किंचित लाजत किंचित हासत
नेसून वसन अमोल अंजिरी
चिंतीत प्रणयसंगम साजरी
मागच्या दुरच्या गेलेल्या काळांत...

तिथेच तशीच थांबली गेलेली
अजून तिथेच थांबली गेलेली
धरणी-कंपाने लाव्ह्याच्या रसाने
असीम धूळीने पुरली गेलेली...

तिची जी तिथेच थांबली होती ना,
तीच रे, माझ्या या गीताची प्रेरणा.

# तेथून

प्रथम प्रेरणा
एकदा सकाळीं
हळूच म्हणाली,
"पुढेच जाऊं या."
ऐकून हासून
घेऊन 'मी'पण
निघालों आपण;
म्हणालों, "पाहूं या."

प्रत्येक पाऊलीं
निराळें दर्शन
निराळें स्पर्शन
वाटेंत थाटलें;
चालतां चालतां
निराळें वचन
निराळें श्वसन
तुझेंही वाटलें.

चालून थकलों
तरीही मुळींच
संपली नाहीच
वाट ही अपार;
भरला भोवती
देखावा हालता

चालतां चालतां
तापली दुपार.

नश्वर अक्षरीं
वेडपी जाणीव
आणून मानीव
मोजला काळ तूं ;
श्रमिष्ट डोळ्यांना
आपली पांगळी
लावून अंगुली
मोजला माळ तूं.

तेथून पाहिलें
दूरचें भकास
सगळें उदास
जगत खालती :
विषण्ण उन्हांत
नव्हती जाई अन्
नव्हती जुई अन्
नव्हती मालती.

तेथे तूं पाहिलें
अफाट, खुरट
पिवळें गवत

जळून मेलेलें ;
कोवळ्या प्रीतीचें
नाजूक संगीत
प्रसन्न रंगीत
सुकून गेलेलें.

दैवाने मागेच
मारून कोलांटी
लिहिलें ललाटीं,
"पुढेच जायचें !"
पुढेच जायचें,
पुढेच जायचें !
नव्हतें नशीबीं
परत यायचें !

# कळ्या-फुलें ने हीं सगळीं पण

लाल पितांबर आणिक चोळी तंग जरीची
लेऊं नको.
इकडे तिकडे अशी न्यहाळत लाजत मुरडत
येऊं नको.

उगाच दावित रुसवफुगवा नांव कुणाचें
घेऊं नको.
काढत भलती सय परवाची दोष कुणाला
देऊं नको.

फार जरी तूं असली सुंदर नांव कुणाला
ठेवूं नको.
कळ्या-फुलें ने हीं सगळीं पण हृदय कुणाचें
नेऊं नको.

# माझ्या या मनांत

वसंत ऋतूंत सकाळीं होता गऽ
पिवळ्या माळांत पळस फुलला !
यौवन-उन्मत्त होऊन होता गऽ
पहाटवाऱ्याने थोडासा झुलला !

इवल्या चिमण्या फांदींत वरती
कोवळ्या कलिका खुडत होत्या गऽ !
तुझ्या या काजळीं कुंतलावरती
परागपाकळ्या झडत होत्या गऽ !

असेंच होतें गऽ निळें हें गगन :
सगळे सुरंग जुळले होते गऽ !
धुंदून गेलेले माझे हे नयन
तुझ्याचवरती खिळले होते गऽ !

—जळून बुजून गेलेलें गुपित
आंतल्या आंतच अजून धुपतें.
मागचें चुकलें गेलेलें गणित
माझ्या या मनांत अजून खुपतें.

## आठवण

लालबुंद कुंकवाची कोर तुझ्या भाळीं होती ;
बारवेच्या काठावर तुझी भेट झाली होती.

कांही कारण नसतां आली होतीस मळ्यांत ;
पोथ हिरवी दुहेरी होती गोरट्या गळ्यांत.

ऐने लावलेल्या नव्या धारवाडी चोळीवर
आवळला होतास तूं पांच पाखांचा पदर.

कांही असेंच तुला मीं भीतभीतच पुसलें :
तुझें वदन कोवळें कणाकणांत हसलें.

तेथल्या तेथेंच तेव्हा तुझें पाऊल थांबलें;
बोलतां बोलतां तूंच शब्द ओठांत दाबले.

लगेच जातांना मात्र बोललीस मनोहर,
"नाही अजून फुटला, बाई, आंब्याला मोहर !"

—मोहरली आहे आता भोवताली आंबेराई ;
भेट झाली—पण आता तुला आठवत नाही.

अशीच कधीची येते कुणाची दुरून हाक !

अशा हाकेची ओळख मन पटवत नाही ;
कांही अंधुक दिसतें, पण आठवत नाही ;
नेत्र मिटले तरीही कशी करूं डोळेझाक ?
अशीच कधीची येते कुणाची दुरून हाक !

शब्दाशिवाय हाक ही अंतर वेधून घेते ;
श्रावणगगनांतल्या गहनामधून येते ;
आज विस्मृत झालेली आहे का ही आणभाक ?
अशीच कधीची येते कुणाची दुरून हाक !

एकदा कुणाचें तरी हृदय अदूर होतें ;
एकदा कुणाचें तरी बोलणें मधुर होतें ;
हाकेंत कोंडल्या जणू यातना सहस्र लाख !
अशीच कधीची येते कुणाची दुरून हाक !

कंचुकीविहीन वक्ष मुक्त कचांत झाकून
निर्लज्ज हासत अशी—अशी किंचित वाकून
वादळी पाऊसधार
आता ओसरल्यावर
आहे ओलेती उभी ही काळ्या ढगांत बाहेर :
तिच्या शरीरकांतीची आहे नीलिमा सुंदर ;
तिने भारून टाकलें साऱ्या विश्वाचें अंतर.

## इथेच कुठे तरी

डोंगरमाथ्यावर
भुरका होता थाट;
खुरट होतें सारें
बाभुळबन दाट.

उतारावर होतें
पडलें भगदाड;
आणखी होती खाली
जमीन गवताड.

खोलांत अलिकडे
नाल्याच्या दोन्ही काठीं
जांभळी, सिताफळी...
झाडांची होती दाटी.

इथेच कुठे तरी
सगळें होतें कुंद;
कुबट उंबरांचा
सुटला होता गंध.

इथेच कुठे तरी
लाचार, सावधान
अल्लड सगुणीचें
यौवन निष्कांचन

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व.
अनुक्रम ३२२६८ दि. ...
वर्ग २८० नों. दि. ...

चळलें होतें थोडें
दाबून स्वाभिमान :
गरम झुळुकांत
सुस्तलें होतें बन.

इथेच कुठे तरी
नंतर वावरांत
तराजू तोलतांना
चढत्या अंधारांत
कोवळ्या सगुणीचें
अगदी आपोआप
थोड्याशा कापसाचें
भरलें जास्त माप
—अगदी आपोआप !
अगदी आपोआप !

इथेच कुठे तरी
नंतर कधी तरी
म्हाताऱ्या सगुणीने
तंबाखू खात खात
सीतेच्या सावित्रीच्या
सांगून नीतिकथा
स्वताची केली थोरी :
अंगुल्या ओठांवर

ठेवून अति स्थीर
ऐकत होत्या साऱ्या
कोवळ्या पोरीसोरी
—इथेच कुठे तरी !
इथेच कुठे तरी !

सात जन्मांची निनांवी आशा धरून मनांत
बकुलफुला, कधीची तुला धुंडतें बनांत !

टाकून दूर नदीच्या पार
उघडें माझ्या घराचें दार
सदैव पिशी हिंडतें अशी निःसंगपणांत :
बकुलफुला, कधीची तुला धुंडतें बनांत !

टाकून सारा शृंगारसाज
तुझ्याचसाठी फिरतें आज.
होईल कसें : झालें रे हसें सगळ्या जनांत !
बकुलफुला, कधीची तुला धुंडतें बनांत !

श्रावणघनगर्जन वाजे :
दिपव दोन्ही नयन माझे—
एका आंधळ्या गहन निळ्या सोनेरी क्षणांत.
बकुलफुला, कधीची तुला धुंडतें बनांत !

# भिरभिर लहरी !

भिरभिर लहरी,
भिरभिर लहरी,
वनपवनाच्या भिरभिर लहरी !

तुझ्यांत भरली तिमिरामधली निरर्थ अविरत मोहक कुजबुज :
दूर रहा तूं : नको तुझ्याशीं भलतें हितगुज, भिरभिर लहरी !
भिरभिर लहरी,
भिरभिर लहरी !

तुझ्यांत भरला नवप्रमदेचा मधुपरिमळमय स्पर्श अचानक ;
तूं अति दाहक : नको तुझ्याशीं ओळखपाळख, भिरभिर लहरी !
भिरभिर लहरी,
भिरभिर लहरी !

भुजबंधनमय, मधुचुंबनमय तुझ्यांत भरला दंश विषारी ;
तूं अविचारी : तुझ्यांत भरली प्रणयथरारी, भिरभिर लहरी !
भिरभिर लहरी,
भिरभिर लहरी !

## उघड नयन !

केव्हाची गेली रे मधुर निशा
सोडून शयन !
हासतें दव हें उन्हांत, सख्या,
उघड नयन !

मालतीवरलीं हासलीं फुलें ;
पक्ष्यांचें उडतें एकच जुळें.
वरती अचल धूसर निळें
अगाध गगन.

पुष्पांचा सुंदर नाजूक शृंगार
करून आलें मी ;
स्वच्छंद चंचल नदीच्या निर्मळ
जळांत न्हालें मी
सोडून मोकळे कुंतल काळे
मी एक चंचल कंचनी झालें.
तुला मी टाकून मोहक जाळें
करीन बंधन.
—हासतें दव हें उन्हांत, सख्या,
उघड नयन !

# दर्शन

विकल वहात होती
झुळुक वारंवार ;
भोवती निःशब्द होतें
प्रत्येक घरदार ;
पथांत हिंडत होती
एकटी एक नार.

कष्टांत चालत होती
नेसून विटलेलें ;
उराशीं धरून बाळ
नयन मिटलेलें
(नव्हता नवरा तरी)
तिलाच जन्मलेलें.

बाहेर सगळें होतें
उदास आणि थंड ;
आंतून पेटलें होतें
पोटांत होमकुंड ;
दुरून पहात होते
चटोर गावगुंड.

## निबिड निशे, ये !

तापला सोशिक सागर खोल हा ;
तापला अगाध आकाशगोल हा.
दिवसभरांत अत्युग्र उन्हांत
विशाल गिरींच्या तापल्या पाठी :
त्यांवर फुंकर घालीत निशे, ये
अशांत संतप्त जगतासाठी !

पथांत दुरांत अत्यंत कष्टांत
हिंडत असतां दिवसा उन्हांत
श्रमिक जिवांच्या तुटल्या आता या
फाटक्या वस्त्रांच्या विटक्या गाठी :
त्या साऱ्या झाकत निबिड निशे, ये
लज्जित नत या पीडितांसाठी !

दिवस फुंकतो जंतरमंतर :
आमच्या दोघांत पडलें अंतर.
दुरावा देणारी भोवती आहे ही
जाग्रत अनंत नेत्रांची दाटी :
नयन झाकत निबिड निशे, ये
अंधार करत आमच्यासाठी !

# या गवतावर

मुग्ध कोवळें ऊन पडूं दे.
एकच कलिका सहज झडूं दे.
एकच पळभर
बसून नंतर
चिमण्यांचें नवयुगुल उडूं दे
या गवतावर.

खुलवित संध्या पिवळी सुंदर
नील नभाचें सुखवित अंतर
कोमलतेनें
लववित पानें
संथ अनिल हळुहळू चढूं दे
या गवतावर.

पुढच्या सुंदर वसंतकाळीं
शांत निरामय मधुर सकाळीं
जग असतांना
मी नसतांना
कुणी तरी प्रियचरण अडूं दे
या गवतावर.

पुनरपि हृदयीं प्रेम जडूं दे
अनुतापाने हृदय कढूं दे
मी असतांना
जग नसतांना
जें नच घडलें तेंच घडूं दे
या गवतावर.

# आरती

वाजली अकस्मात
घंटेची घणघण
दुतोंडी मृदंगाची
सताल भणभण :
भोवती निनादला
प्रत्येक कणकण.

मंदिरकोनीं माझ्या
स्वप्निल अंतराळीं
सत्याने विभ्रमून
क्षणैक चाल केली :
वरती होते लोक
चरण होते खाली.

झांजांच्या गजरांत
आरती होत होती ;
मंदिरगाभाऱ्यांत
सर्वत्र होत्या ज्योती ;
तुपाचा उग्र गंध
भरला सभोवती.

गाभारा वर होता
उंचांत अति धुंद ;
आणखी खाली होती

सर्वत्र लांबरुंद
चोपडी काळीभोर
फरशी चिरेबंद.

चरण आले होते
वृद्ध नि प्रज्ञावंत ;
दुसरे होते गोरे
कोवळे मदोन्मत्त ;
कित्येक होते मृदु
इवले गतिवंत.

कार्तिक महिन्याची
भरून हुडहुडी
सत्याची नीट चाल
पडली नागमोडी :
दिसल्या अंधारांत
विकृत घडामोडी.

इवल्या पावलांनी
करीत बडबड
ओढले फरफरा
चरण वृद्ध, जड :
वाजली प्रज्ञावंत
कवटी थडथड.

पाहिली होती मागे
भयाण काळ्या रातीं
कवटी हीच मूक
ओसाड नदीकाठीं
आणिक हासतांना
अनेक हाटोहाटीं.

बसून एक धक्का
सगळ्या भवताली
दुसरी एक भ्रष्ट
कहरी लाट आली :
प्रकाश गेला वर
अंधार आला खाली.

नंतर आले काळ्या
फरशीवर गोरे
कोवळे मदोन्मत्त
चरण नाचणारे :
काजळी आवसेच्या
तमांत जणु तारे.

प्रत्येक सुंदर त्या
अतृप्त, नित्यभुक्त
चरणावर होते

अनेक जित, नत
अनन्य हृदयांचें
हलाल लाल रक्त.

हेच ते नित्यभुक्त
चरण मदोन्मत्त
पाहिले होते मागे
होऊन अनुरक्त
दिवसा कधी, कधी
निबिड अंधारांत.

नंतर निनादांची
चेतना उतरली ;
मंदिरगाभाऱ्यांत
आरती ओसरली :
सगळें दगडांची
फरशी विसरली.

सुवास नाद सारे
होऊन छिन्नभिन्न
निद्रेच्या अंधारांत
नंतर झाले शून्य ;
उठलों पहाटे मी
होऊन अति खिन्न.

# वाटेच्या वाटसरा !

उद्दाम धुंद लाटा
किनारीं धावल्या रे !
तमास बिलगल्या
सांजेच्या सावल्या रे !

झोंबतो गार वारा ;
वाजतें पान पान ;
वरती ढग काळे ;
भोवती किर्र रान :

नको गऽ बाई असा
तुमचा मौनमुखी
दगडचिखलाचा
मुलुख अनोळखी !

ओढतें सारखें हें
नदीचें पाणी खोल :
चळेल पाय, बाई,
जाईल माझा तोल !

कुणीच नाही माझें :
लागलें झुरणी मी ;
कळप चुकलेली
अल्लड हरिणी मी.

दुरून चालूं नको
करून इतराजी :
वाटेच्या वाटसरा,
सोबत तुझीमाझी !

## प्रत्यय

अवकाशामधल्या या
कणाकणांतून, गडे
तुझे लक्ष लक्ष नेत्र
बघतात माझ्याकडे !

इतके दिवस, देवा
नयन मिटून मीच
हट्टाने बोलत होतों
की तूं कुठेच नाहीस !

आज उघडले डोळे
आणि सरले रे क्लेश :
माझ्यासमोर अगदी
किती जवळ आहेस !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३६२६९ विः काव्य
क्रमांक १६०८ नों दि ३/४/६८

धडाड वाजत आलें वादळ
धुंद अनावर अन् अविचारी :
पडले वाडे, फिरले नांगर,
प्रबळ करांनी धरल्या नारी ;
भग्न तनूंवर खिळवित नयनें
तरुशिखरांवर बसल्या घारी :
बिरुदें मागत आले धावत
मग फितुरीचे गारपगारी.
डं चिक डं !
डं चिक डं !

मलीन सुरकुतलेल्या गालीं
गळला अश्रू एक अवंचक
मत्त, दर्पमय, खळ वैऱ्यांचीं
सोसत वचनें हृदयविदारक ;
बद्ध, भीतियुत अनन्यगति गम
नत झाला जित जेत्यांसन्मुख :
शरणाच्या सरणांत जन्मली
आज-उद्याची आग भयानक.
डं चिक डं !
डं चिक डं !

## हिरण्यगर्भ

अनिरुद्ध अनिवार आद्य ऋषींचा दर्भ मी ;
सृजनाचा सूत्रधार आहें हिरण्यगर्भ मी.

शब्दशून्य अविचल कर मृत्यूचा थंड मी ;
दुवार अनिविकल यमधर्मांचा दंड मी.

भोगलालसामंडित पातकी इंद्र मी आहें ;
अपकारक शापित खंडित चंद्र मी आहें.

नित्य आक्रंदत आहें जुन्या जगाचें भूत मी ;
क्षितिजांत हासताहें नव्या मनूचा दूत मी.

उष्ण आणि शीत आहें मीच हंत आणि संत ;
सर्व विश्वाचा या आहें मीच आदि आणि अंत.

चहूकडे घोरताहे श्रावणाची रात्र काळी ;
वादळाशीं झुंज घेत विस्कटल्या तिमिरांत
श्वास टाकत झोपल्या धुरकट ओल्या चाळी.

खिडक्यांच्या फटांतून शीळ घालतात वारे ;
जळधारांशीं खेळत, असूनही परिचित
अनोळखी नजरेने बघतात बंद दारें.

काजळीं जांभळी हवा निद्रेंतच आहे चूर
आणि पारावर काळ्या पिंपळाच्या पालवीची
अधूनमधून होते पावसाशीं कुरबुर.

पथकोनावर दूर मलिन काचेच्या आंत
वरखाली जात येत अंधाराला झोके देत
एका उंच कंदिलाची फडफडताहे वात.

देऊन कोपरखळी शांततेला क्षणभर
अर्धनग्न आनंदाचा एका अल्पवयस्काचा
अंधारांत घुमताहे उत्तान गीताचा स्वर.

दीपाजवळून पथ न्यहाळत वारंवार
हीन स्वच्छंद पंकजा कृश हालवित भुजा
नेटकी एकटी गेली एक उग्रगंधा नार.

आकाशाच्या हृदयाची दाखवीत आर्त भेग
देऊन तमाला धक्का भग्न निमिषांत एका
झळकून दूर गेली वाकडीतिकडी रेघ.

पाऊसपाण्यांत ओसाड माळांत असलों तर तूं
 इंद्राची कमान हो सप्तरंगिणी ;
आसरा पाहून थकूनभागून कुठेही झोपलों
 तर तूं मधुर हो स्वप्नसंगिनी.

एकटा एकच चालत असतां विचारतंद्रींत
 फसवी, पिशी हो सुखाची हूल तूं ;
बाजूला कुठेशी वाऱ्याने झडतां पुष्पित लतिका
 मरंदमय हो प्रत्येक फूल तूं.

दिवसा दुपारीं उदास उन्हांत हिंडलों तर हो
 गगनधरेचा मीलन-भास तूं ;
काळोख्या रात्रींत एकटा पांथ मी तमांत चालतां
 रंगव भासांत राधेचा रास तूं.

मनाच्या खोलांत उरलीसुरली अजून आहे ती
 जागृत कर तूं वासना रंगीत ;
तमांत क्रमाने विरत जाणाऱ्या सांजेचें बन तूं
 अवाक निवांत शृंगार-संगीत

## गर्जत आहे गोंधळ त्याचा

उन्हांत झळकत झडली खाली
गर्द जांभळ्या मेघांची सर ;
हिरवळ भिजली, झुकली, उठली—
(नकोस पाहूं उगाच भिरभिर !)

दुरांत कोठे आज अभावित
साद घालते एकच सनई ;
अतिव मनोहर तिचा मधुर स्वर—
(सरोष चढवूं नकोस भुवई !)

झिंगत गर्जत वाहत आहे ;
ऐकत नाही गोष्ट वाजवी ;
या वाऱ्याचा जोर अनावर—
(कुरकुरते ही काय पालवी ?)

तरल दुहेरी ही तरुशाखा
झुकते इकडे तिकडेही पण
(सांग तिच्यावर खिळले हे कां
बावरलेले तुझेहि लोचन ?)

या गगनाच्या उरांत ओल्या
बहु रंगांची कमान उठली ;
गर्जत आहे गोंधळ त्याचा—
(हासत तूं कां नयनें मिटलीं ?)

# सारें कांहीं विसरून

इथे नाही कुठे कांही नाही उंच वाडा :
रुतलेला आहे एक संसाराचा गाडा.
म्हणून हें स्वप्नमय, रम्य, निरागस
न्यहाळूं दे रूप-स्पर्श-गीत-गंध-रस.

कुणाचीही शांत इथे होत नाही तृषा ;
क्षणांतच दुपारते सकाळची उषा.
लागूं दे या तहानेच्या वासनेला चळ :
प्राशूं दे या आभासांचें रम्य मृगजळ.

इथे नाही दयामाया, इथे नाही प्रीती ;
इथे आहे करंट्यांची कोरडीच नीती :
मग पडूं देत गळां सैल सावकाश
मोलावर मिळणारे फोल प्रेमपाश

इथे वंचनेच्या माळा पडतात गळां ;
इथे जाळतात मन जाणिवेच्या झळा.
याच्यापेक्षा लागूं दे हें अहोरात्र असें
सारें कांही विसरून हासणारें पिसें.

झिंगले वारे फुललें सारें रान :
गेला मदन सोडीत पंचबाण.
वाढली तरुपर्णांत गती ;
उठल्या गात वंशांच्या तती ;
उठली रसा सुगंधवती
करून रसपान :
गेला मदन सोडीत पंचबाण.

फुलला पुरा पळस लालबुंद ;
ठेवून नेकी नाचला केकी धुंद.
उन्मत्त सात रंगांत अति
सजून आली सुंदर रति
उभीच होती पाठीशीं सती
लावण्यरूपखाण :
गेला मदन सोडीत पंचबाण.

बसला होता मांडून ठाण यती
आंतून होती ज्वलंत उग्र मती :
भिऊन झाली कुंठितगति ;
शिरली नाही शिवांत रति
पतीला तिने आणली नति
संकेत विसरून :
गेला मदन सोडीत पंचबाण.

## उगीच कांही

आता पडली रात्र कभिन्न काळी : झाकलें सारें रान.
आता निजलें जग सारें;
आता उरले फक्त तारे;
उरलें नाही कुणाचें कांही बंधन महिमान :
आता वाटतें गावें उगीच कांही मधुर एक गान.

## तिकिटाशिवाय

झुक झुकट झुकट झुक अति बिकट जागा :
अति निकट आणखी दूर साऱ्या चरणरांगा.
बडबडते खडखडते आणि उडते गाडी ;
अशी वरून कुणाची तरी अति रुतते काडी.
माझ्या खोलांत पृच्छा करीत उभे अनेक नग ;
घन तमांत एका कोनांत सारें भरलें जग.
आंत तिमिर आणि बाहेर झगझगाट सारा :
जीव कोंडतो (—कुणी भांडतो) फक्त वाजतो वारा.
उभें जीवन तिकिटावीण असा हिंडत आहें ;
कांही कळेना माझेंच मला काय धुंडत आहें.
आलों बाहेर : झालें जाहीर प्रश्न दिशांत दाही ;
काय उत्तर देऊं फत्तर कांही सुचत नाही.
सारे नियम मोडतों, पण खरा भेकच आहें ;
काय हासतां—तुमचा माझा पथ एकच आहे.

# मलाहि कुणी नाही

धावता पथिक तूं ;
तुझा रे भरवसा
सरत्या सांजेंतला
मोहक कवडसा :
दिसून दोन क्षण
भारून माझें मन
जाशील दशदिशां !

रंगीत पाखरा, तूं
सोसून सारें हीव
डहाळीवर थोडी
करून चिवचिव
स्पर्शून तुरे-तुरे
सोडून जाशील रे
गावाची माझ्या शीव !

सोनेरी लाल धूळ
उठली ठायीं ठायीं ;
सरते सांज पण
नकोस करूं घाई :
शपथ तुझी घेतें
तुझ्याचवाणी येथे
मलाहि कुणी नाही !

# अपुरी झोप

पक्षी वेळून मान घेतील तान गगनगमनाची ;
मुग्ध बघून दूर रेषा
पृथ्वी हासेल पुष्पवेषा ;
हासेल उषा लेऊन शाल सुनील गगनाची
चाफा सुगंधमय देईल सय दूरच्या सजणाची.

कांही मधुर गंध चाखते धुंद आंतली इतराजी ;
मंद वहात आहे वारा ;
एक पहात आहे तारा ;
पडलीं दूर जमिनीवर प्राजक्तफुलें ताजीं ;
पिशी जागत आहे पापणीवर अपुरी झोप माझी.

## मला जगायचें आहे

कोरड्या या भूमीवर
श्रावणाच्या सरीखाली
उगवले तृणांकुर
इथेतिथे भवताली :
मला जगायचें आहे.

ओलसर पदराचा
स्पर्श मनोहर धुंद ;
दाट काळा कचबंध
देतो मुग्ध मंद गंध :
मला जगायचें आहे.

जरी हत मानसांत
झाली पर्वताची राई
असूयेची लाट उंच
खाली उतरत नाही :
मला जगायचें आहे.

अथांग पाणी, उबट निळा धूर.
        ढग अंधारलेले,
        धुकें पिंजारलेलें,
पुसट आहे चंद्राची कोर दूर.
अथांग पाणी, उबट निळा धूर.

अवाक वारा बोचक थंडगार.
        जळ भिजत आहे,
        कुजबुजत आहे :
पल्याड सारें अंधुक निराकार.
अवाक वारा बोचक थंडगार.

पाठीस सारें निजलें निर्विकार.
(जगरहाट आहे !)
वर पहात आहे
प्रतीक्षामय जीवन निराधार :
पाठीस सारें निजलें निर्विकार.

# अदृश्य कुणी तरी

प्रत्येक प्रयाणाला मागची पुढे येते आडवी आणभाक;
प्रत्येक पावलाशीं आहेत कोरलेल्या बंधनरेषा लाख.
मिटल्या नयनांची उद्याची भीति आज सगळें बळ नेते:
भरल्या नयनांत अस्वस्थ कासावीस कालची कथा येते.
उसन्या बळावर कठिण निकराची चढण चढतांना
पतित झालों, हाय, पतन इतरांचें वळून बघतांना.
चालत असतांना भावना करपली कोवळ्या यौवनाची;
अनेक थोडक्यांनी भागली नाही मुळी तहान जीवनाची.
मध्येच कुठे तरी लपून अंधारांत जीवन शोधतांना
कुठून तरी, हाय, बिकट प्रश्न येतो करारी जीवघेणा.

—अदृश्य कुणी तरी दुरून न्यहाळीत तमांत उभा आहे
—तमांत उभा आहे!

# श्रावण

जलधारांत तारा छेडत आला श्रावण छंदीफंदी :
त्याची चढते गीतधुंदी.

श्रुतिमधुर घनगंभीर स्वर सुंदर श्रावणाचे
मधु मदिर भावनांचे.

घनतमांत आहे झुलत पिशा चाफ्याचें पान पान :
त्याचें हरलें देहभान.

सळसळत आली झुलत्या तरुलतांत तरतरी
—तुझ्या उरांत थरथरी.

जरा हासत जरा भिजत आंत आलीस धांदरून
अशी पदर सावरून.

अशी रुसून मुकी बसून नको आवरूं तुझा आज
ओला विस्कटलेला साज.

—जळधारांत तारा छेडत आला श्रावण छंदीफंदी :
त्याची चढते गीतधुंदी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६२६६ विः काव्य
क्रमांक २६०८ नों दि: ९।६।६४

## पुढेच हा

पुढेच हो, पुढेच हो ;
कोवळेंच आहे ऊन :
तुला बघत आहे तो
गुलाबपाकळ्यांतून.

पुन्हा परतून नको
त्याचें मनोगत नासूं :
पानापानावर त्याचे
पडले आहेत आसू.

नको वेळावून मान
अशी परतून जाऊं :
डहाळीडहाळीवर
त्याने उभारले बाहू.

गत आणि वर्तमान
बघतात दिशा दाही :
अजूनही त्याला तुझा
नाही भरवसा कांही.

## माझ्या मनांतली व्यथा

काळीकभिन्न रजनी ;
तिचे लुकलुकणारे
वर बधिर नयन ;
खाली वांझ भूमीवर
एक ताड उभा आहे
पुटपुटत पानांत
त्याचें करुण कथन.

दिसणाऱ्या निकटांत
एक गाय मुकाट्याने
उभी, करते रवंथ ;
न्यहाळत तिमिराला
आणि मधूनच कांही
आखूड नि वाळलेलें
कुरतडते गवत.

एक फडफड झाली ;
एक तडफड झाली ;
थरकला ताडतरु :
त्याच्या हृदयामधून
एक चित्कार करून
अंधार चिरीत गेलें
एक कर्कश पाखरू.

माझे सुजलेले ओले
नाही मिटलेत डोळे ;
आता वाजलेत चार.
अरे सोबतच्या पांथा,
काय सांगू तुला कथा !
माझ्या मनांतली व्यथा
ताडतरूला विचार !

# छाया धरून उराशीं

निळी काजळी सोडून वेणी मोकळी
छाया धरून उराशीं रात्र झोपली.
साज होऊन किंचित विस्कळीत
श्वास टाकीत गंधित आणि संथ
स्वप्नतंद्रींत जुईची फांदी वाकली :
मृदु तमांत कोमल तनु झाकली.

काळा पदर घेऊन आली सरळ
तमामधून प्रतिमा तुझी विरळ ;
ओठावरचें तसेंच तेंच हांसू ;
नेत्रकोनांत तसेंच तेंच आसू ;
एक निमिष थांबलें मन तरळ :
काळा पदर घेऊन आली सरळ.

अशी खिळली अचल तुझी नजर ;
नाही हालत मुळीच तुझा अधर :
नको माझ्याही डोळ्यांत आणूं पाणी
गत दुःखांच्या काढून आठवणी...
प्रश्न नाहीत ; नाहीच आता उत्तर.
अशी खिळली अचल तुझी नजर.

कुणीं वरून हळूच विभा शिंपली
आणि त्यांतच भासांची सभा लिंपली.
जरी निघून अनेक गेले ऋतु

१३८४५

सय ठेवून अशीच येत जा तूं...
एक झुळूक—किंचित जुई कंपली ;
छाया धरून उराशीं रात्र झोपली.

थिजलेले पथतरु ;
मूक हिरवीं कुरणें ;
सांज काळवंडलेली ;
गर्द ओल्या जांभळीच्या
हृदयांत कोंडलेल्या
चिवचिव किलबिली.

कुठे पाठीमागे दूर
अनिवार भाराखाली
कुरकुरताहे आरा;
आकाशाच्या फटींतून
एकटाच जात आहे
एक अनोळखी तारा.

असूनही पायापाशीं
बोलेना चालेना कांही
गवताचें पातें पातें ;
कठोरपणाने खाली
वाट टोचून बोलली
तुझें माझें नाही नातें.

नगरांत पथावर
सहजच्च मिळणाऱ्या
सर्व नजरांच्या खाली

कुठेही न भेटणाऱ्या
समांतर, विरोधक
वेगळाल्या वाटचाली.

एका बंद दारापाशीं
एकटेंच अधोमुख
डोळे मिटलेलें गूर
शब्दशून्य अंधारांत
मधूनच भूमीवर
वाजवित आहे खूर.

फळ्यांतल्या फटांतून
थोडी थोडी दाखवितो
गल्लींतली कुंद हवा
दार लावलेल्या एका
दुकानाच्या कोनांतला
कंजूष, चोरटा दिवा.

सौधावर थंड, मुकें
उदासीन पांढुरकें
उभें अचल गगन;
आणि अंतीं आंत आहे
नेहमीचें तेंच तेंच
खोल अबोल शयन.

नेहमीच हासणारी
चित्रामधली सुंदर
टक लावलेली बाई ;
आंत खोल जात जात
कोनांतला दीप म्हणे,
" कांही नाही, कांही नाही. "

# अटळ या कड्यापाशीं

क्षितिजविहीन सांज...
खाली खोल सिंधूवर
इथे तिथे खंडलेली
मुकी खिन्न अस्ताव्यस्त
धुरकटलेली विभा.

धुक्यांतून दुःखांतून
क्रमलेल्या पथावर
पाठीमागे दूरवर
मातींतच रुतलेल्या
मूक पाषाणांची सभा.

अटळ या कड्यापाशीं
चिरंतन भुकेला मी
सत्याचें हें कडू फळ
अर्धवट चाखलेलें
धरून हातांत उभा !

## उभा अंधार शरमला

ओला अंधारी वास जुईचा ; जल पडतें झिमझिम ;
पानापानांत शिरशिरी.
तुझी चाहूल फक्त बोलते आणि भरल्या मागे-पुढे
शून्य पथांत हुरहुरी.
काळें क्षितिज आलें जवळ : कांही करतें तळमळ ;
झालें वरचें नभ खुजें ;
झाले फिकट दीप तमांत ; थंड विकल अधरांत
थरथरतें गान तुझें.

घर पडकें—एक टिचकी—पुन्हा टिचकी निकडीची ;
शीळ आखूड तीनवार ;
एक जांभई—चुडे वाजले ; कुणी हासलें खदखदा :
झालें उघडें एक दार.
फक्त झाडांत सर वाजली ; झालें सगळें गुपचूप :
पथप्रकाश वरमला.
आंत हासला—पुन्हा हासला अर्धभुकेला असून तूं :
उभा अंधार शरमला.

नभगोलांतून जाते कुणी तरी
गीत चांदण्यांचें गात.
वर कुठे तरी किंचित हालला
तिच्या पदराचा काठ.

निरामय रात्रीं दूर तमांतून
निघतात अविरत
कुजबुजणारे सागरलाटांचे
तिचे शब्द शत शत.

वाकल्या फांद्यांच्या खालून जातांना
देतात मीलनभास
मत्त प्राजक्ताच्या विकसनांतले
तिचे सुगंधित श्वास.

भरल्या ढगांत कधी उमटतें
तिचें कोमल पाऊल;
वाऱ्यांतून कधी मधूनच येते
तिची पुसट चाहूल.

मूक शब्दशून्य तिची मनोव्यथा
धुक्यावर भरलेली.
माझ्या पापण्यांत तिची गूढकथा
न संपतां सरलेली.

# म्हातारा एक

झाडांच्या गर्द धरून छाया पेंगत आहे
एकलकोंडी हिवाळी रात्र.
ढगाळ जुना रिकामा पथ चालत आहे
चंद्राची कोर विकलगात्र.
म्हातारा एक अचल ओले पाणेरी डोळे
पांढरे केस फिकट ओठ
मनाशीं कांही बोलत होता काळांत जुन्या
इथे नि तिथे ठेवून बोट.
कोंडून श्वास मध्येच जणू मिटून डोळे
काळाचा रोख रोधत होता ;
कालौघामध्ये स्वतःच मुळीं हारवलेला
हारवलेलें शोधत होता.
बघतां धुकें मागचें सारें थिजून गेलें
खिळवलेल्या पापणीवर
अंधारलेल्या चांदण्यांतले विस्मृत जुन्या
लावणींतले शृंगारस्वर.
विस्कटलेल्या गतांत होती वाजत कुठे
उगाच सैल जुनाट तार ;
भुरक्या शून्य भ्रमांत दूर कंपित गोल
आंधळें होतें क्षितिज गार.

# हवा हिरमुसलेली

हवा हिरमुसलेली ;
ओठ मिटलेली रात्र.
एका खिडकीच्या आंत खाटेवर बसलेली
कांही पिंगट पिवळ्या कांही पांढऱ्या बटांची
जख्ख म्हातारी
मान हालवत आहे
दुकानांत ठेवलेल्या टकमक बघणाऱ्या
बाहुलीसारखी...
कुठे तरी असलेल्या
घड्याळाची टिकटिक ;
दीप थरकत आहे
भिंतीवर रुखरुख.

टिकटिक टिकटिक.
आणखी थोडेंसें पुढे
उघडल्या दारापाशीं उजेडाच्या चौकोनांत
दगडाशीं पडलेलें एक हिरवें जांभूळ :
बोलली भुरकी हवा हिरमुसलेली,
"पायदळीं पडलेल्या दगडाला व्यथा आहे ;
अकारण पडलेल्या जांभूळाला कथा आहे."

टिकटिक टिकटिक.
आणखी थोडेंसें पुढे
डोकावून बघणाऱ्या छपराचे नेत्र ओले

उताण्याच पडलेल्या भुरकट चिखलाचे
मिचमिचतात डोळे.
हवा गारठ हिरवी शुकशुकाट गल्लींत.
एक श्वान जात आहे कडेकडेने सुंगीत.

# दुपारीं

हिवाळी उन्हांत शब्दशून्य शांत दुपारचें घर ;
खोलींत कोमल मुके हालतात अंधाराचे पर ;
कुठे तरी दूर दुरांत जाणारा तंतुवाद्यस्वर.

खिडकीजवळ पात्रांत उन्हाची नजरेची फेक :
तुळईवरला थरथरणारा फिकामुका एक
जललहरीच्या प्रेमकथेंतला हळुवार लेख.

मिटलेलें दार, लोंबलेली कडी, खाली पायपोस ;
अकारण कुणीं खाली टाकलेला कण्हेरीचा घोस ;
टेबलावरती पानें मिटलेला मुका शब्दकोष.

खिडकीबाहेर हालवीत पान करताहे केळ
मुग्ध प्रेयसीच्या पदरासारखा हळुवार खेळ :
एक निमिषच छायाप्रकाशाचा बदलतो मेळ.

निरामयपणें नळांतून खाली पडणारें जळ ;
कुजबुजणारी तरुपर्णांतली मंद सळसळ ;
त्याच त्याचपणें अभावांत जातो एक एक पळ.

जाणिवेमधली क्षितिजाची रेषा विभ्रम करते ;
एक एक स्मृति बदलून रंग स्वप्नांत शिरते ;
माजघरांतली तुझी गुणगुण नुसती उरते.

ऊन वाढताहे आणि जळताहे धुकें विस्मृतीचें ;
नेत्रपातीवर आलें अनावर ओझें जागृतीचें ;
विझलेला दीप, विटलेली शय्या, गात्रांवर शीण ;
कोंड फुटलेल्या फिक्या थकलेल्या भिंती उदासीन.
धूलिकणमय कवडशांतून करताहे चाळे
काळ्या छपराच्या उंच कोनांतलें हालणारें जाळें.
तृणपातीवर सुकला फसवा दहिवरसेक;
खिडकीबाहेर नेहमीची जुनी पुन्हा धूळफेक.
आंत सारें सुस्त ; फक्त घड्याळांत आहे तरतरी ;
उठणेंच आता भाग आहे तुला उठवेना तरी.
दूर पथावर वाजतात खोटे मानभावी नारे ;
उघडून दार अजोड अटळ कलहांत जा रे !
दाबून ओठांत मृत दिवसाचा मूक दुखवटा
दूर ठेवलेला घाल हासणारा पुन्हा मुखवटा.

## रवींद्र : तुझें असें कांही तरी

तुझ्या वेळीं होतें आहे तसेंच हें जग :
कधी आनंदाचें हासू कधी तगमग.
अजून तशीच रात्र बघतात तारे ;
तसेच हे वाहतात सकाळचे वारे.
गेलास तूं तरी तुझें उरलेलें आहे ;
तुझें असें कांही तरी भरलेलें आहे.
सरणाऱ्या निरामय रजनीच्या ओठीं
स्फुरतात हळुवार तुझ्या गुजगोष्टी.
आकाशांत आहे विभा तुझ्या समतेची ;
सागरांत आहे छाया तुझ्या ममतेची.
वैराग्य साधून मुक्ति नाही तुला प्रिय :
असंख्य बंधनांमध्ये महानंदमय
घेतला तूं मुक्तिवाद : असें तुझें होतें
कामरूप रजोगुणी वसुधेशीं नातें.

कटीवर घट अशी सुकुमार पोर ;
झडीचा पाऊस आणि रम्य अभिसार ;
        घरोघरीं चाललेल्या सुखदुःखकथा ;
        मनोरम बनलेली हृदयाची व्यथा ;
दूरचा किनारा, नदी उचंबळणारी ;
सभय उत्सुक अशी नाव नाचणारी ;
        मधुररहस्यमय श्रावणाची रात ;
        पथिकविहीन पथ, एकटाच पांथ ;
मेघावर मेघ आणि वादळाचा वारा ;
दारीं उभा असलेला वाट पाहणारा ;
        दुपारची वेळ आणि पाखराचें गाणें ;
        आडावर निंबावर हालणारीं पानें ;...
अहो भव्य कारागीर, स्वप्नाकार अशा
विश्वहृदयांत तुम्हीं काढलेल्या रेषा,
        चिरंतन बनलेले असे नानाकार
        कोण पुसणार आणि कसें पुसणार ?

भडकला प्रलयाग्नि; कडाड पडले तरु रात्र वैराची :
फडफडून पाखरें खाली पडलीं लागून धग खैराची.
उग्र वास आणि धूर; थयथयलीं पाउलें रानवाऱ्याचीं.

सरत आलेली रात्र आणि शिणलेलें गात्र सारे उदास
आणि भूमीवर खाली जळणारे रूप रंग आणि सुवास :
आहे विफलता सारी; नाही उरलेला कांही कुठे उल्हास.

उरलेल्या कोटरांत अनगिनत झुरले चिरविरही;
दिसणाऱ्या संहारांत खाली पडून विरतें दहिवरही;
येते क्षितिजाची रेषा गहिवरतें मानस पण तरीही

कुठे तरी उरलेल्या जळकट फांदीवर कांही नसून
मरणाच्या वाऱ्यावर गीत जीवनाचें गातो पक्षी बसून
पुन्हा फुलतात फांद्या तेज हळुवार येतें रसरसून.

# अंधारांत होती गात रातराणी

फक्त तुझे श्वास आणि कांही भास ;
तिमिराने सारी खोली झाकलेली.
आणि खिडकीच्या उभ्या चौकोनाच्या
करड्या रंगांत शेजारघराची
रेडिओची तार काळीं आखलेली.

कांहीच नव्हतें कांहीच नव्हतें ;
मंद सळसळ—बुजलेल्या तारा ;
छपरावरून खाली पडणाऱ्या
बंद पावसाच्या बिंदूंची टपक ;
उत्तररात्रीचा गार ओला वारा.

आठवण होती : पूर्वरात्रींतलें
अजूनही होतें पापण्यांत पाणी
गार ओला वारा ; थांबलेल्या धारा ;
अजूनही मूक सुगंधाचें गीत
अंधारांत होती गात रातराणी.

निमिषांत कांही काळे उभे गज ;
वीज फिकी मुकी :
पुन्हा तिमिराची काळी कुजबुज.

भुरकट भिंत उघडी खिडकी :
तमांतून जाते
ओलांडून रस्ता नजर तिरकी.

एक पाठमोरी किंचित गोरटी
मांसल पाठ अन्
पांढरा झंपर पदर पोपटी...

नव्हतें कांहीही कसलेंही गूज ;
तसें कांही नाही
तसें कांही नाही अगदी सहज...

दोरीवर धूत वस्त्रावर मुकी
सरकते लाट
अवाक चोरट्या वासनेसारखी.

## चेंडू (हें बालगीत नाही.)

होता चांभाराचा देव ;
त्याने केली उठाठेव :
त्याचा सारा वनवास
आता सरलेला आहे.

त्याला कुणी हासूं नका ;
त्याला कांही पुसूं नका :
त्याच्या गोल पोकळींत
वारा भरलेला आहे.

अनेक आहेत पण
याची एक जात आहे ;
लाथा खात खात असा
उंचावर जात आहे.

इथून तिथेच आणि
तिथून तिथेच जातो ;
तसा कुणी भेटला की
कधी कधी कच खातो.

अकारण कधी कधी
याला कुणी झोडतात ;
ऐन निकराच्या वेळीं
याला कुणी फोडतात.

## अर्थ टाळून

वाऱ्याशिवाय होता वारा;
चंद्रावाचून चंद्रबळ;
वाटेशिवाय वाट होती;
होती वेदनेवीण कळ.

धुंद आकाशउंची होती
एका ठेंगण्या छपरींत;
होती ओळख अनोळखी
रीत सगळी विपरीत.

क्रूर कोपांत होती प्रीती:
अनमोलांत होतें मोल.
होता प्रकाश तिमिरांत;
सारे मुकेच होते बोल.

नीट वाटेने जाऊनही
नाही कळत तुझा कल;
आता पुनव असूनही
नाही दिसत चंद्रबळ.

झालें ठेंगणें तुला सारें
आता उत्तुंग प्रासादांत;
आता ओळख वाढूनही
तुला सुचते रीतभात.

मोल सगळें अनमोल;
शब्द एकेक सोलतेस.
आता मधुर हासूनही
अर्थ टाळून बोलतेस.

निबिड तिमिरांत
लपून
उरांत आंत खोल
ठेवली एक खूण
जपून.

उणिवेवर आले
तमांत
मुद्दाम टाकलेल्या
भकास प्रकाशांचे
प्रपात.

घडते दहनाची
करणी
शब्दांची घासतांना
अरणीवर दुजी
अरणी.

नजर चांदण्यांच्या
जाळींत :
जीवन भटकलें
भरून भग्न स्वप्न
थाळींत.

उठला वेदनांचा
पिंपळ :
वाढून शाखा शाखा
बसला हृदयांत
अटळ.

अजून थरथर
अधर ;
हातांत उरलेला
अदृश्य उर्वशीचा
पदर.

# बोलत आहे साप

अरुंद पथांतून
हळूच जात आहे
विमुक्त धूम्रकेशा ;
दीपकगोलावर
अखंड उडणाऱ्या
संकीर्ण सूक्ष्म रेषा.

धुरांचे हेलकावे
किंचित थबकून
जातात अंधारांत ;
ढगांचे वर काळे
मिचकलेले डोळे
विचकलेले दात.

दुसऱ्या टोकांतली
कोरत हळूहळू
ओशट भोरी हवा
टेकत आला काठी
भिकारी अर्धपोटी
आणखी एक नवा.

बागेंत एडनच्या
पिकलें एक फळ :
बोलत आहे साप
करत सळसळ.

## अतृप्त अधरांची कुजबुज

परावर्तलेली उन्हांतली एक झगमग लाट
अंधारलेल्या या खोलींतून गेली फिरवून हात :
जाणतों मी सारे गाडीमधले त्या चेहरेमोहरे ;
जाणतों मी सारे कोण कोणावर करतील मात.

तांबूस पानांची रेखीव डहाळी करताहे नाच :
चडफडतो अन् खडखडणारा खिडकीचा काच.
गच्चीवर उभी रस्त्याकडे टक लावलेली बाई :
मला जाणवते तिच्या ओठांतल्या स्मितांतली आंच.

तुम्ही म्हणाल की हव्या कशाला या तुला तुणतुणी
असेना कां कुठे गच्चीवर किंवा मोटारींत कुणी :
ठीक ठीक पण सांगा तरी कशा टाकूं उपसून
नखें खुपसून गच्च बसलेल्या जुन्या आठवणी ?

दुरांतल्या धुंद अभावामधून कांही हालचाली ;
शेजारघरांत कुठे तरी दूर पडलेली थाळी.
अर्धउघड्या या खिडकीमधून फुत्कारतो वारा ;
खोलींत या कुंद चुकचुकतात छतावर पाली.

मिटल्या मनामध्ये इवल्या सावल्यांची बुजबुज ;
विवस्त्र वासनांच्या अतृप्त अधरांची कुजबुज.

## रानमळ्यांत रानमळ्यांत

रानमळ्यांत, रानमळ्यांत.
दोर हातांत तुझ्या, मला
नाही सुटल्या कांही गाठी ;
दूर पुसट पायवाट
अडखळली नदीकाठीं ;
कांही जाऊन तडकले
शब्द रेतीच्या वळ्यावळ्यांत
रानमळ्यांत, रानमळ्यांत.

रुंद अबोल बारवेंत
होते झोपले रानवारे ;
गर्द उलटें पिंपळाचें
बिंब किंचित हालणारें ;
तोल जाऊन कांही कांही
शब्द बुडाले खोल जळांत
रानमळ्यांत, रानमळ्यांत.

मूक ओठांत घोळतांना
धून मधुर नव्हाळीची
वर सहज पाहतांना
वीण डहाळीडहाळीची
जुईखालून जातां कांही
शब्द कोंडले बंद कळ्यांत
रानमळ्यांत, रानमळ्यांत.

थोडें इकडतिकडचें
कांही उगाच पुसतां तूं
थोडी उगाच सुटलेली
वेणी गुंफीत असतां तूं
जीर्ण कुंपणापाशी कांही
धडपडले शब्द फळ्यांत
रानमळ्यांत, रानमळ्यांत.

घट्ट मुसक्या बांधलेले
बैल थकून वाकतांना
जरा बाहेर पडलेलें
एक कणस टाकतांना
तरतरून मग कांही
शब्द दबले गोल खळ्यांत
रानमळ्यांत, रानमळ्यांत.

वाट दबली होती पिशी
दाट पिवळ्या पाचोळ्यांत;
गर्द जांभळीखाली तुझे
माझ्या हातांत होते हात;
आणि उरलेसुरलेले
शब्द विरले खोल गळ्यांत
रानमळ्यांत, रानमळ्यांत.

# सामान्य माणूस

'दुरांतून देते हाक गुपचूप हिवाळी पहाट ;
पुढे पुढे जाते भुरकटांतून नागमोडी वाट.
रात्रींतलीं स्वप्नें गढूळ होतात हवेंत या भोऱ्या ;
ठराविकपणें पुढे खेचतात बांधलेल्या दोऱ्या...

'माझ्या दारापाशी उभा आहे कुत्रा अंग झटकून ;
चुलीपाशी आहे निजली नवरी पाय मिटकून.
तिचें गूढ मन...
कर्ण की अर्जुन...?
संशय हा द्वाड :
मोडूं दे हें झाड दाट पालवीचें काडकाडकाड.

'शेजारसाळूची फेडायची आहे गव्हाची कणिक
वेळेवर कामीं पडली म्हणून थोडीशी आणिक...

'दातांमध्ये घट्ट धरून हिरवा पदराचा काठ
इकडेतिकडे बघून चोळीची बांधणारी गाठ
काल पाहिलेली मनामध्ये येते असून पारखी
रानमोगऱ्याच्या उत्तररात्रीच्या सुगंधासारखी.

'डहाळीवरच्च गिरगिरतात तुरळक पानें :
कधी तुटतील आणि धुंडतील सारीं माळरानें ?
एकटाच असा रानांत बोलतो, शपथ रानाची :
सवयच नाही कुणापाशी कांही शब्द बोलण्याची.

आणि पलिकडे उघडी पडली हलुवार लाली
गाठाळ वाकड्या शुष्क बाभळीच्या बरगड्यांखाली
जांभळीवरचा ओरपतो पाला भुरकट उंट ;
मैदानावरचा फिकट पाचोळा ; काळींतले खुंट.

'आहे काय माझें ज्याच्या बळावर मारूं मी बढाया !
म्हणतात कोणी माझ्या नांवावर होतात लढाया.'

## मुकाट मालतीचें श्वसन

केव्हाची ओली सांज   पांढुर तिमिरांत आटली ;
झाकल्या आकाशाची   वाकळ कुजलेली फाटली.

समोर भोवताली   अचल होतीं घरें सकल ;
मधून होत होता   गोठ्यांत घंटानाद विकल.

गुंतलें होतें मन   विगत दिवसांच्या कथांत ;
कुणीच नव्हतें या   पाऊस खंडलेल्या पथांत.

सगळीं बंद दारें ;   बघत होतें नभ वरून ;
समोर पथांतून   एकटा गेलास तूं दुरून.

दाबून हेलकावे   मनाचा आवरला तोल मी :
नुसतें पाहिलें रे,   बोललें नाही काही बोल मी.

झुरला थंड वारा   झाडांत अडलेल्या गाण्यांत ;
चांदण्या थरकल्या   पथांत साचलेल्या पाण्यांत.

थोडीशी हुडहुडी,   किंचित ओल्सर वसन :
ऐकत होतें उभी   मुकाट मालतीचें श्वसन.

## ‘शीळ’पूर्वीच्या कविता

# दिवेलागण

ल्यालें निळी पैठणी भर्जरीची ; कपाळावरी कुंकवाची चिरी ;
पाठीवरी नाचते पुष्पवेणी, गळा घातली होनमाळा वरी.
संध्या नभांतील शोभा चितारून गेली पुढे पश्चिमेभीतरी ;
आला शरच्चंद्र पूर्वेकडे हा, हळू हासल्या तारका अंबरीं.

दारीं तरी मी उभी एकटी दीन : ही संपलीही दिवेलागण ;
लावूं कशी दीप : माझा मनोदीप नाहीच आला घरा साजण.

मी जळद फिरें नवनार
नागिणी चपल सुकुमार गऽ !
कुणिकडे तरी बघणार :
चहुकडेच हिरवेंगार गऽ !

झुळझुळे तळीं जलधार ;
गरगरा उडे वर घार गऽ !
पाखरू करी वनगीत ;
हसविते फुलांची रीत गऽ !

नवनवे करी मन नाच
'नवतिचा सजण' म्हणतांच गऽ !
अन् सवच असा वरतून
बघतसे सखा निरखून गऽ !

मी जळद फिरें नवनार
नागिणी चपल सुकुमार गऽ !

ही उभी; उभे भोवती फुलांचे थवे ;
ही चंद्रकलेची राणी गगनांत तारकांसवे.

ही कुठे कळेना मना : फिरे कल्पना ;
ही जगत्तरंगीं वीची की मनांतली भावना.

हें कुणीकडे संगीत नित्य चालतें ?
ही मंद हृदयसारंगी की निर्झरिणी नादते ?

ही अगोचरा कोमला मनीं नाचली
की संध्याहृदयीं रंगे ही तरंगरंगावली ?

शोकार्त दीन हृदयांत कोण हासली ?
की तरलित चपला व्योमीं घनपटलतमीं नाचली ?

गूढांत कोण लाजली ? मला भासली ;
जललहरीवरती किंवा कमलाची हल्ली कळी ?

ही कुठे दिसेना कुठे कळेना तरी
ही रंजविते अभिरामा शृंगारगौर साजरी.

हा भास वृथा आभास दिसेना मना :
मधु नाचत नाचत येते ही कोणि तरी मोहना.

ही अखेर, राजसा, सुकेल पुष्पमाला !
वाट पाहते तुझी : उशीर फार झाला.

भावना उच्चंबळून
ऊर ये असा भरून ;
वक्षिं नाचते अजून आणि मुक्तमाळा.

अंतरीं तुझाच ध्यास ;
धीर ना प्रसाधनास :
मुक्त सोडला तसाच केशभार काळा.

धुंदवी मना समीर ;
उल्हसून ये शरीर ;
जाहलें, गडे, अधीर गीतगायनाला !

ही सतार नादवंत :
सूर काढले अनंत.
हा फुलेल का वसंत : एकदा निमाला.

जाहला मनास भास
तूंच खास हासलास ;
लाजलें : उगाच आस लागली जिवाला.

अंतराळीं चांदराणी हासते लावण्यखाणी;
संगती येशील का तूं? मोहने, आहेस मानी!

हासुनी जाशी पुढूनी दावुनी खोटे बहाणे :
मंदशी नाजूक आहे चाल हंसीची जनानी.

नाचरे दावून डोळे मोहवीला जीव माझा :
चारुतेची चांदणी तूं; नेटकी आहे रहाणी.

हें असें पाहूं नको तूं अन् असें जाऊं नको ना;
ये, किशोरी, सांग आता कामरूपाची कहाणी!

मूळचा नादी, विकारी मी असूं दे सांब भोळा;
कंचनी तूं रातराणी भिल्लिणी आहे भवानी.

कां अशी लावून आशा पाहसी मागे फिराया?
अंतरींचा सोड किंतू : दास मी आहें इमानी.

हिंडुनी रानोवनीं मी प्रेमभावें आणलेलें
घाल तूं वेणींत आता केतकीचें पान, राणी!

# वनराणी

मी सजून आलें वनराणी :
तूं समोर, सजणा, गुणखाणी !
कोवळीच मी राजस बाळा ;
ही गळ्यांत माझ्या वनमाळा ;
मी म्हणेन माझीं वनगाणीं :
मी सजून आलें वनराणी.

हा वसंतवारा, बघ, आला :
उडवितोच मेला पदराला.
हासलीं, सख्या, सगळीं रानें :
घे कळ्याफुलांचे नजराणे !
तूं बघूं नको नवख्यावाणी :
मी सजून आलें वनराणी.

थबकतें नि बघतें वरखाली :
सरकली तसूभर काचोळी.
सारखें सुखाने मन नाचे ;
लागले दिवे, बघ, गगनाचे.
ये हासत तूं राजसवाणी :
मी सजून आलें वनराणी.

त्या आदिकाव्याच्या जुन्या विस्तारल्या काळांतुनी
हा सोमपेला सारला हातावरी माझ्या कुणीं ?

सौंदर्य नाचे भोवती ; ही धुंद आली लोचनां :
आता जगाच्या लोपल्या खोट्या, खऱ्या खाणाखुणा.

रोमांचकारी भावना सैराट आल्या अंतरीं ;
शब्दांमधूनी धावल्या या नादब्रह्माच्या सरी.

स्वर्गीय संगीतें नवीं हीं नादवीताहे सदा
पद्मालयीं मोरावरी शृंगारदेवी शारदा.

ये, जीवना, या वैभवीं : साम्राज्य चाले शाहिरी ;
उन्मादकारी सोहळा वागीश्वरीच्या मंदिरीं.

# तर बांध ना कटिबंध तूं

नेस तूं नव पैठणी :
ये गडे, मनमोहिनी !
सांध्यसुंदर चांदणीसम हास या सदनांगणीं.

शांत या नजरेंतला
भाव मंगल कोवळा ;
काजळीं कचबंध त्यावर शोभतो गजरा तुला.

धुंदलीं बघ अंतरें ;
लाजणें कर हें पुरें.
दाबतेस कशास हे अधरोष्ठ किंचित बावरे ?

दूर दूर नको सरूं :
या लतेभवती फिरूं.
चंद्रमा वर हासतो ; लव हाल्तो हिरवा सरू.

हा सुरम्य शरदृतू :
भावना भलती कथूं.
स्वैर अंचल नाचतो तर बांध ना कटिबंध तूं.

ऐलतटावर, पैलतटावर तुझीच मंदाकिनी ;
तुझा दिन तुझीच मधुयामिनी.
बाह्यांतर विश्वांत चालतें तुझेंच आवाहन ;
जगाला तुझेंच संजीवन.
शीत काळ संपून शेवटी वसंत आला घरा :
नाच रे, प्रीतीच्या पाखरा !
मंगलमय सूरांत सारख्या आळवून रागिणी
फिरूं या जगताच्या रंगणीं.
फिरूं जनांतीं, फिरूं वनांतीं मनपवनाच्या जवें :
हासले कळ्याफुलांचे थवे.
पण हाय, थांब, कर बंद तुझें कूजन !
पाखरा, फडकवूं नको पिसारा पण !
बाहेर दिसे हें तसें नसे नंदन ;
धनुष्यधारी निषाद बसले असतिल येथे तिथे :
काळजी जीवाला वाटते.

# पिर्तीच्या फिरल्या नजरा

पिर्तीच्या फिरल्या नजरा :
येशील घरा, येशील घरा !

वहात होती पूर्णामाई ;
पल्याड माझी आंबेराई ;
कसंऽ पाहिलंऽ हसून, बाई,
कळ्याफुलांचा दिला तुरा :
येशील घरा, येशील घरा !

मी मालक, ही माझी राई :
कामगार तूं केवळ, बाई,
काय अशी भलतीच कमाई ?
राग तुझा उलटा, चतुरा,
येशील घरा, येशील घरा !

मी तर आहें राजस वाळीं ;
गळ्यांत माळा चिरी कपाळीं ;
ऐनेदार अशी कांचोळीं ;
ये तर कर मजला मुजरा :
येशील घरा, येशील घरा !

## हें काय, गडे !

काय गडे, हें काय, गडे !

वाटेवर तूं सहजच दिसली ;
सहज लाजली, सहजच हसली ;
अंतर पण झुरलें इकडे ;
हें काय, गडे !

मधुर वाजवित सहजच कंकण
निघूनही गेलीस तरी पण
पुनःपुन्हा दिसतेस पुढे ;
हें काय, गडे !

भावभरित की नुसतें सुंदर,
सहजच की हें बुद्धिपुरस्सर ?
कुठवर हे जुळवूं तुकडे :
हें काय, गडे !

# म्हणत म्हणत मधुगीत

म्हणत म्हणत मधुगीत, जिवलगे, म्हणत म्हणत मधुगीत !

दूर कुठून तरी अवचित ये सरळ सहज सलगींत.
सरळ सहज सलगींत, जिवलगे, म्हणत म्हणत मधुगीत !

ललित विलासिनि, सालंकृत ये यौवनभर मिरवीत !
यौवनभर मिरवीत, जिवलगे, म्हणत म्हणत मधुगीत !

मीं केलेली विविध फुलांची पखरण ये तुडवीत.
पखरण ये तुडवीत, जिवलगे, म्हणत म्हणत मधुगीत !

वाटलेंच तर जा तदनंतर स्वैर तरल लहरींत
स्वैर तरल लहरींत, जिवलगे, म्हणत म्हणत मधुगीत !

एकच वेळ तरी ये, ललिते, जीवनपथ उजळीत !
जीवनपथ उजळीत, जिवलगे, म्हणत म्हणत मधुगीत !

# शोध

अंतराचा रंग कोठेही जुळेना ;
भावनेचा गंध कोठे आढळेना.
यौवनामध्ये कधीचा धुंडतों मी :
आवडीचें फूल कोठेही फुलेना.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ...३६२-६९... वि: काव्य
क्रमांक ...१२२५... नों दि ३/४/६४

## तुला मला, गऽ, तुला मला !

कोयळ गाते मंजुळ गाणीं : किती कोवळा तिचा गळा !
सखी चांदणी राजसवाणी हासत बघते तुला मला.

मुकाच बघ हा तुझ्यापरी
झुलतो चाफा तुझ्यावरी :
हळूहळू हासला कुमारी ! कुणास हा हासतो खुळा ?
तुला मला गऽ तुला मला !

एकसारखें बघूं असें
परस्परांना हवें तसें ;
सांग वाटतें कसें कसें : मग हसेल तें ऐकून मळा
तुला मला गऽ तुला मला !

उभी जशी तूं मुकी कुणी :
काय चाललें तुझ्या मनीं ?
कळेल आपोआप, साजणी, तुला मला गऽ तुला मला !
तुला मला गऽ तुला मला !

सर्वत्र मला आपदा : जगत आरामीं—आरामीं .
तूं मात्र जीव जाळसी दूर निजधामीं.

विपरीत चढे भरपूर पूर नियतीचा—नियतीचा :
भयभीत उतरला दूर नूर नवतीचा.

एकांत मला भोवतो इथे अंधारीं—अंधारीं ;
आकांत तुझ्या मानसीं तिथे, सुकुमारी !

सारखी, सखे, आणखी किती झुरशील—झुरशील ?
जानकी, कुठे तूं, कुठे तुझा घननीळ ?

वैयर्थ्य पटे अंतरीं भरे भयशंका—भयशंका :
सामर्थ्य मला मानवी ; दानवी लंका.

खग्रास झाकळीतसे मोहजंजाळ—जंजाळ ;
प्रीतीस आडवावया उभा कळिकाळ.

चिंतून तुला पण, पहा, चढे मगदूर—मगदूर !
येथून कशी दूरवूं तुझी हुरहूर ?

## साजणी गऽ !

रात्र गाते सांध्यरंगी रागिणी, गऽ !
हासते ही मंदतेजी चांदणी, गऽ !

मंद तेजांतून आता हासल्या या
पारिजाताच्या कळ्या साऱ्या जणी, गऽ !

मुग्ध, मायावी, सुगंधी मोहनीचे
मंत्र गाते ही उषाराणी किनी, गऽ !

भोवताली हासल्या दाही दिशाही
चारुतेने धुंदल्या जागेपणीं, गऽ !

झोपली अद्यापही तूं फक्त येथे :
मी कशी सोसूं सजा ही, साजणी ग ऽ !

# तिचा प्रश्न

हासूं नको, सख्या, नुसतें सारखें मला :
वेडीपिशी तरी पुसतें मी तुझी तुला.

होतें किती दुजी पण केलें मला तुझी :
चंद्रा, मला कुठे पण रे चांदणी कळा ?

लावण्यमंजरी, सजणा, मी कुठे तरी ?
माझा तुला कसा रुचला रंग सावळा ?

शब्दाशिवाय अन् पुसल्याशिवाय पण्
कां रे, मला अनंत तुझा ध्यास लावला ?

अत्यंत कोवळी फुलवावी कशी कळी ?
मैना मुकी : तिचा चढवावा कसा गळा ?

# निःशंक झोप घे तूं

कांही नसून हेतू मी जागतों खुळा ;
निःशंक झोप घे तूं : मी पाहतों तुला.

धावून सारखी गऽ तूं भागलीस की :
आहे तुझा सखी, गऽ, हा देह कोवळा !

चोहूकडे असें हें विश्रब्ध, राजसे !
आहे निळ्या निशेचा आनंद झावळा.

आता नको कुणी ती दैदीप्य चांदणी :
प्रीतीस पाहिजे, गऽ, हा रंग सावळा.

बागेंतली कळी की पानांत झाकली ;
बाहूंत झोपली, ग ऽ, तूं मुग्ध मंजुळा !

# कधी ?

ही अरुणार्द्र, सुरंग तुझी जिवली ;
वीज तुझ्या नयनांत कुरंग-निळी ;
कोमल, श्यामल ही कमनीय तनू ;
सांध्यतरंग तुझे मधुभाव जणू.

स्पष्ट म्हणूं पण मी मधुवाक्य कसें ?
लोक पिसे भवती : करतील हसें.
आणि म्हणून तुला हृदयामधली
सावध, सूचक हाक दुरून दिली.

हाय, कधी कळणार तुला पुरतें
एक हताश निराश रती झुरते !
रुक्ष असा सरणार कसा अवधी ?
शुष्क मळ्यांत फुलेल वसंत कधी ?

१३८०५

# जुनी प्रीत

शिणलें जीवन;
जागविते पण
शून्य, गहन, घन ही रजनी,
गऽ सजणी !

मोहकरुण या
मनांत उठल्या
गत दिवसांच्या आठवणी,
गऽ सजणी !

सरले खडतर
दश संवत्सर
तरी फिरवितों तेच मणी,
गऽ सजणी !

दारुण ठरल्या
पहिल्यावहिल्या
तूंच दिलेल्या ओळखणी,
गऽ सजणी !

तुझाच पहिला
आता उरला
दूर कोठला एक कुणी,
गऽ सजणी !

तरी तमावर
तुझी मनोहर
मूर्त उमटते मधुवदनी,
गऽ सजणी !

मन तळमळतें
मन तळमळतें ;
उरांत जळते प्रीत जुनी,
गऽ सजणी !

## सहज भरेल फुलारी

सहज भरेल फुलारी, माझी सहज भरेल फुलारी.

तरुलतिकांची बाग बहरली
मधुर सुगंधित सारी : माझी सहज भरेल फुलारी.

खुपोत काटे : वेदनेंत त्या
गोड अवीट थरारी : माझी सहज भरेल फुलारी.

दूर कुंपणाजवळ घडूं दे
भेट तुझी सुखकारी : माझी सहज भरेल फुलारी.

विविध फुलें उधळीन, सख्या, मी
तुझ्या-तुझ्यावर सारीं : माझी सहज भरेल फुलारी.

भवती सगळे अनुचर यांचे ;
प्रतिरोधक एकच केवळ तूं.
दुर्दम, घातक बहुभुज यांचे ;
प्रबळच हे खळ अन् दुर्बळ तूं.

नुरलें यांना बंधन कांही ;
विटंबलें रे, यांनी जीवन !
विकल अनाथा, जगांत नाही
तुला आसरा कुणाचाच पण !

घन तिमिरांतच विरली येथे
हाक तुझी ही केविलवाणी ;
पाषाणावर सुकलें येथे
तुझ्या करुण नयनांचें पाणी.

जरी अशी ही घातक घटिका
जरी चाललें छलन भयंकर
नको वाकवूं मान, अगतिका,
जरा धीर धर, जरा धीर धर !

बघावयाला तुझें विटंबन
झाली कौरवसभेंत दाटी ;
हसले दुर्जन सभोवती ; पण
कळवळला प्रभु तुझ्याचसाठी.

द्वादश वर्षें भरलीं दारुण :
वनांत विरल्या हताश हाका.
अखेर पडले धुळींत दुर्जन :
तुझीच चढली विजयपताका.

तुझ्या पापमय अपहरणाचा
जरी खळांचा असेल हेतू
कृतांत सिंधूवर या भीषण
तुझ्याचसाठी उठेल सेतू.

# प्रेम व चुकी

इतक्यांत कशी हसली पण प्रीत तुझी ?
इतक्यांत कशी रुचली पण रीत दुजी ?
सुमगंधित पावन तो मुकला बगिचा :
पहिलीच अधोगतिकारक जात तुझी.

भलती अहिसूचित तूं शिकलीस कला :
सगळाच कसा जडवूं पण दोष तुला ?
पुढती नशिबांत जरी वनवास, सखे,
जपणार खरोखर देव तुला नि मला !

गतजीवित तें मुकलें पण, चंद्रमुखी,
उरली हृदयांत अशी, बघ आपुलकी !
सुख संयमजन्य, सखे, पण आपण हे
चिरदुःखित प्रेमसुखी करणार चुकी !

आपला सदाचा आहे प्रेमभाव ताजा ;
ते हसोत सारे : आहे देव तुझामाझा.

हे असोत गाजी अथवा ते असोत बाजी
प्रेयसी गडे, प्रेमी मी एक तुझा साधा !

कल्पना निराळी त्यांची मानवैभवांची :
तूंच एक राणी माझी; मीच तुझा राजा

ते हसोत सारे : आहे देव तुझामाझा

## प्रतीक्षा

निशेने भरली
दुनियेवर धुंदी ;
धूप हा जळतो मधुगंधी.

कुणीही नाही ;
भवती सर्व सुनें ;
तेवते समई शांतपणें.

बसून आठवतों
तुझाच मी महिमा ;
पाहतों तुझीच मी प्रतिमा.

निराशेभवती
नवती थरथरते :
उरांतच सलगी हुरहुरते.

विरह हा जुलमी :
बघ, मी तगमगतों ;
कधीची वाट तुझी बघतों.

# कधी तरी

नको उसासा, नकोत अश्रू, नको उमाळा ;
पडेल जाणें कधी तरी : मी भिऊं कशाला ?

अजाणतेने नको नवाजूं नको निखंदूं :
कडू असो गोड की, जिवा, घे पिऊन प्याला !

सरेल आता सरेल ही उम्र दो दिसांची :
नको तरी राहिला सदाचा पुढे हिवाळा.

जरी इथे वाटते मिळावी उशी परांची
मिळेल केव्हा तरी पुढे गोवरी उशाला.

तुला, जिवा रे, फिकीर आहे जरी दुजांची
तुझी पुढेही जरूर वाटेल का कुणाला ?

पुनःपुन्हा आसवें गळालीं जरी कुणाचीं
स्मृती पुढे विस्मरून जातील या जिवाला.

अनंत आशा : फुलोत वा ना फुलोत कांही ;
असेल जो तो पटेल, दैवा, तुला हवाला !

दे त्रास हवा तितका तूं रे पण करतें प्रेम मी !

नशिबाची सरली थोरी
ममतेची तुटली दोरी
बोलाची केली चोरी रे, पण करतें प्रेम मी !

भिजवितें अधीर दिवाणें
मधुयौवन अश्रुजलाने
तूं पहा अदय नयनाने रे, पण करतें प्रेम मी !

तन्मणी जपविला फुटका
सुमहार जगविला तुटका
ओसरते जीवनघटिका रे, पण करतें प्रेम मी !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३६२६९ विः काव्य
क्रमांक २२०८ नोंः दिः ११/५/६८

## प्रेमाचें तत्त्वज्ञान

गहन गूढ तिमिरांत एकलें स्फुरलें पहिलें तरलित तांडव ;
'व्हावें' म्हटलें आणिक झालें त्यांतच माझें जीवन अभिनव :
तूं नव्हतीस, सखे, पण तूं नव्हतीस, सखे !

तुझीच पहिली ओढ लागली दुभागलें मी मला मनोमय :
आणि तेंच उमटलें तपाने संकल्पित कमनीय हिरण्मय
मादक रूप तुझें, मधुमादक रूप तुझें.

दिक्कालांवर माझें जीवन अनंत रूपांमधे हासलें :
अभिनव सांगातिणी, तरीही विविध रंगरूपांत नाचलें
युगयुग प्रेम तुझें, मग युगयुग प्रेम तुझें !

किती जन्म लोटले निराळे : पुन्हा मिळालें नंतर जीवन ;
दुभागलेल्या एक जिवाचें पुन्हा आज हें घडलें मीलन :
घाल गळ्यांत मिठी, चल, घाल गळ्यांत मिठी.

# आर्यांचें गाणें

उठा हो उठा !
निबिड, गहन, घनदाट दाटले अशिव मेघ वादळी ;
कडाडलें नभ आणि फाटलें दूर क्षितिज काजळी.
रुधिरतृषित ही विकट हासली घोर समरदेवता :
उठा हो उठा !

असुरराज्य पसरलें जगावर : सुजन सकल दंडले ;
सोम हिसकला ; गोधन लुटलें; यज्ञकर्म खंडलें.
वज्रपाणि रिपुहंतक उठला इंद्र यज्ञतारता :
उठा हो उठा !

एक राज्य जगतावर पसरूं विश्व करूं आर्य हें ;
जिंकत जिंकत पुढेच पसरूं : कार्य शिरोधार्य हें.
पतित पुरातन पुन्हा आज हा उंच धरूं बावटा,
उठा हो उठा !

स्मित सौम्य मोहक अन्
चारु, रम्य रूप-अहंकार ;
मधु नूपुरध्वनि अन्
मंद मंजु कंकणझंकार ;

हळुवार, शंकित अन्
चाल चोरटी ललितेची ;
कुजबूज कंपित अन्
रम्य, गूढ आतुरतेची ;

रमणीकरामधल्या
जळत्या निरांजनज्योती :
कमनीय ही सुषमा
गत गोकुळांतच होती.

जर गोकुळांतच त्या
जन्मतों खरेंच गड्या, मी
तर घातल्या असत्या
गोपिकांसवे फुगड्या मीं !

जर पाहिले असते
प्रेमभासही नुसते मीं
यमुनातटावर त्या
गीत गाइलें असतें मीं.

जखडून बंधन हें
खिन्न हा असा नसतों मी
तर चांदण्यांमधले
रास खेळलों असतों मी.

# सखे ग ऽ!

आवरतों पण काय करूं हें अंतर हुरहुरतें, सखे ग ऽ!

भेठगाठ कायमची सरली ;
ओळखही असशील विसरली :
बघ उरली पण तुझी आठवण हृदय भरून इथे, सखे ग ऽ!

आज तुझ्याविषयीचें गाणें
अनुचित झालें आहे, सजणे !
हृदय अनावर हें नाही तर मीं म्हटलें नसतें, सखे ग ऽ!

तूं हें माझें गीत खरोखर
कधी कदाचित ऐकलेंच तर
ऐक घडीभर विस्मर नंतर अस असशील तिथे, सखे ग ऽ!

## आज एकादशी

आणवा सर्वही : निर्शणाचें करूं ;
खंड कांही नको : भक्तिभावें चरूं.
चांगल्या खारका, साबुदाणा हवा ;
अन्न कांही नको : शेंगदाणे भरूं.
आज एकादशी, आज एकादशी !

खूप रागामधे नाक उंचें करूं ;
एक हातामधे पंचपाळें धरूं ;
अन् कुणीही घरीं ओरडो की रडो
देवळांच्या कडे अन् कुठेही फिरूं.
आज एकादशी, आज एकादशी !

द्या बटाटे, खवा, शर्करा, गूळ द्या ;
आज अन् वाहवूं द्या तुपाच्या नद्या.
शीघ्र सूर्योदयीं द्वादशीला करूं
सांडया, कुर्डया, भात, लाडू उद्या.
आज एकादशी, आज एकादशी !

स्वस्थ सुस्तीमधे छे, नका हो पडूं ;
दूर कोठे तरी अन् नका हो दडूं.
आज लावूं नका जास्त बोलायला :
या अजीर्णामुळे तोंड झालें कडू !
आज एकादशी, आज एकादशी !

# विसर विसर, हृदया !

विसर विसर, हृदया !
हृदया,
विसर विसर, हृदया !

वनकुरणाची शेज सुखाची,
अरुणविकसनें सित कलिकांचीं,
मंद, सुगंधित वनझुळुकांची
लहर, हृदया,
हृदया,
विसर विसर हृदया !

झुलणारी तरुशाखा वरची,
'चिव चिव' चिमण्यांची त्यावरची,
दुराकडे खिळलेली नवती
नजर हृदया,
हृदया,
विसर विसर हृदया !

उगीच खुडलेला वनपाला,
उगीच केलेल्या फुलमाळा
उगीच हृदयाला आलेला
बहर हृदया,
हृदया,
विसर विसर, हृदया !

# असा जिवाचा जिवलग तूं

कसें कुणाला आज कथूं
कसें कुणाला हाय कथूं
कोमलतेने कसा सरकला अवचित हृदयाजवळच तूं !

दिलीस फसवी हूलच तूं ;
पुरी पाडली भूलच तूं.
मला वाटलें होतें तेव्हा मोहक नुसतें फूलच तूं.

पटलें होतें प्रेमळ तूं ;
हृदयविमोहक परिमळ तूं ;
हाय, अशी पण आज मांडली हृदयविदारक चळवळ तूं !

वाढविली, बघ, तगमग तूं ;
कोण कसा कळलें मग तूं ;
फूल मानतां सापच ठरला असा जिवाचा जिवलग तूं.

जरी विखार भयंकर तूं
तरी हवास निरंतर तूं :
कर दंशितही हें अंतर पण नकोस देऊं अंतर तूं.

नम्र नमस्कार, तुला नम्र नमस्कार !

अवनत पददलित असे जन दुबळे हे ;
चिरलांच्छित नत जीवित बघ जगले हे ;
शतकांच्या जुलुमांनी तगमगले हे :
तूंच अशा पतितांचा एकच आधार.
नम्र नमस्कार, तुला नम्र नमस्कार !

कोलाहल कलहाचा थांबत नाही ;
हिंसात्मक बनली बघ मानवता ही ;
उद्भवली भयसूचक घातकताही :
तारक तव शांतीचा दिव्य पुरस्कार.
नम्र नमस्कार, तुला नम्र नमस्कार !

पूनित हे, पावन हे, परम उदारा,
तूं अविचल शुभमंगल दर्शक तारा !
तूं अविरत जीवनरसअमृतधारा !
अजरच तूं, अमरच तूं, तूंच चिदाकार !
नम्र नमस्कार, तुला नम्र नमस्कार !

# शशिवदने !

शशिवदने, मन कठिण तुझें पण अतिकोमल तनु !
मधुर वदन पण दो भुवयांचें अदय तुझें धनु !
मी पुसतों ना पुसतों तों, सखि, निमिषभरांतच
'ना' म्हणते पण लाजत हसते वळवित तूं हनु.

धरणीभवती संतत फिरतो चिरशंकित, सखि,
चिरलांच्छित पण चिरमोहित हा शशि खंडित, सखि !
हें चिरपूजन मी करतों पण तूं 'नाही' म्हण :
प्रेम चिरंतन मीं वरलें हें, चिरवांच्छित सखि !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 36226 वि: काव्य
क्रमांक 1208 नों दि 3/4/68

नाव नाचरी ;
नाव नाचरी ;
भोवती, सखे, सुरंग सांज साजरी !
तूंच धीवरी.

तूंच धीवरी :
मीच शंतनू :
नीट न्यहाळीन तुझी सावळी तनू.
'ना' नको म्हणूं.

'ना' नको म्हणूं ;
चालवूं वल्हें :
या तरंगरंगणांत रंग नाचले,
प्रेम हासलें.

प्रेम हासलें :
चाल त्या तटीं.
एकवूं नकोस मला या अशा अटी.
—चाल एकटी.

चाल एकटी :
लागलें पिसें.
आणखी नकोस करूं आपलें हसें.
—चाल, राजसे !

भरलें किती वस्त्रभांडार येथे
उघडा तरी मी अतिभागलेला ;
भवती किती हीं पिकलींत शेतें
फिरतों तरीही पण मी भुकेला.

बघतों निवारा पण, हाय, जो तो
भिरकून देतो अपमान माथीं ;
करतों पुढे याचक हात मी तों
नुसताच येतो उपहास हातीं.

चढले इरेने खल दानवी हे
पडले, अरेरे, पण सभ्य खाली !
ठरलें प्रभावी बल पाशवी हें ;
नयनीतिमूल्यें बिनमोल झालीं.

विसरून सारी ऋजुभावरीती
इहजीवनाचे विसरून हेतू
निजला जिव्हाळा, निजली सुनीती :
निजलास का रे, करुणामया तूं !

## जग हसलें रे !

जग हसलें रे, जग हसलें !

भावि सुखांच्या
नव अमिषांनी,
चिर ममतेच्या
उद्घोषांनी,
गाढ भावमय
करपाशांनी
मन फसलें ;
जग हसलें रे, जग हसलें !

प्रीत झळाळत
होती झगमग ;
तुच्छ लेखलें
होतें मी जग ;
दुरावला तूं :
मुख माझें मग
हिरमुसलें :
जग हसलें रे, जग हसलें !

पुन्हा उगवली
आशा सुंदर ;
नकोस फसवूं
तसेंच नंतर.

पुनरपि माझें
आतुर अंतर
रसरसलें :
जग हसलें रे, जग हसलें !

डाव मांडून भांडून मोडूं नको!

आणलें तूं तुझें सर्व; मीं आणलें;
सर्व कांही मनासारखें मांडलें:
तूंच सारें तुझें दूर ओढूं नको;
डाव मांडून भांडून मोडूं नको!

सोडले मीं तुझ्याभोवती सर्व गे,
चंद्रज्योतीरसाचे रुपेरी फुगे;
फुंकरीने फुगा, हाय, फोडूं नको!
डाव मांडून भांडून मोडूं नको!

'गोकुळींचा सखा' तूंच केलें मला;
कौतुकाने मला हार तूं घातला:
हार हासून घालून तोडूं नको;
डाव मांडून भांडून मोडूं नको!

काढलें मीं तुझें नांव, तूं देखिलें,
आणि माझें पुढे नांव तूं रेखिलें:
तूंच वाचून लाजून खोडूं नको!
डाव मांडून भांडून मोडूं नको!

'आज झिम्माच खेळूं' म्हणालीस तूं:
एक वेढा दिला—दूर झालीस तूं;
हात हातांत गुंफून सोडूं नको;
डाव मांडून भांडून मोडूं नको!

■ 'शीळ'नंतरच्या कविता

अभिसार  अंदाजें १९५५
वादळवारा  अंदाजें १९५३
कळलें नाही की  ३०·४·५४
प्रेरणा  ३०·४·५४
तेथून  २·८·५४
कळ्या-फुलें ने०  १·९·५४
माझ्या या मनांत  १३·९·५४
आठवण  ७·३·५५
हाक  ७·३·५५
कल्पना  ७·३·५५
इथेच कुठे तरी  अंदाजें १९५५
बकुलफुला  १८·१०·५५
भिरभिर लहरी  अंदाजें १९५५
उघड नयन  अंदाजें १९५५
दर्शन  १५·२·५६
निबिड निशे, ये !  २९·५·५६
या गवतावर  अंदाजें १९५६
आरती  ७·८·५६
वाटेच्या वाटसरा  अंदाजें १९५६
प्रत्यय  अंदाजें १९५६
डं चिक डं  ५·४·५७
हिरण्यगर्भ  १९·८·५७
वाकडीतिकडी रेघ  २९·८·५७
एकटा पांथ मी  २२·९·५७
गर्जत आहे गोंधळ०  अंदाजें १९५७
सारें कांही विसरून  अंदाजें १९५७
संकेत विसरून  अंदाजें १९५७
उगीच कांही  ३·१·५८
अपुरी झोप  ३·१·५८
तिकिटाशिवाय  ११·१०·५८
मलाहि कुणी नाही  १८·१०·५८
मला जगायचें आहे  अंदाजें १९५८
अथांग पाणी  अंदाजें १९५८
अदृश्य कुणी तरी  ८·१·५९
श्रावण  ८·२·५९
पुढेच हो  अंदाजें १९५९
माझ्या मनांतली०  अंदाजें १९५९
छाया धरून उराशीं  अंदाजें १९५९
'कांही नाही,०  अंदाजें १९५९
अटळ या कड्यापाशी  अंदाजें १९५९
उभा अंधार शरमला  अंदाजें १९५९
धुक्यावर भरलेली  अंदाजें १९५९
म्हातारा एक  अंदाजें १९६०
हवा हिरमुसलेली  अंदाजें १९६०
दुपारीं  अंदाजें १९६०
मुखवटा  ९·१२·६०
रवींद्र : तुझें असें०  अंदाजें १९६१
रवींद्रास  अंदाजें १९६१

दा. क. 93865

रवींद्रगीत अंदाजें १९६१
अंधारांत होती रात० सप्टेंबर १९६१
लाटा : सगळ्यांचें० सप्टेंबर १९६१
चेंडू सप्टेंबर १९६१
अर्थ टाळून अंदाजें १९६१
पदर २.१०.६१
बोलत आहे साप २.१०.६१
अतृप्त अधरांची० २८.२.६२
रानमळ्यांत० १९६२
सामान्य माणूस १९६२
मुकाट मालतीचें श्वसन ९.८.६३

## ■ 'शीळ' पूर्वीच्या कविता

दिवेलागण जून १९३०
वनगीत अंदाजें १९३०
ही २४.८.३१
आस १५.७.३२
केतकीचें पान ९.३.३३
वनराणी जुलै १९३३
सोहळा जुलै १९३३
तर बांध ना कटिबंध तूं २३.७.३३
काळजी जीवाला वाटते १८.९.३३
पिर्तीच्या फिरल्या नजरा २८.११.३३
हें काय, गडे! अंदाजें १९३३
म्हणत म्हणत० अंदाजें १९३३
शोध अंदाजें १९३४
तुला मला, ग ऽ,० १६.१.३४
विरहगीत २३.१.३४
साजणी ग ऽ! २६.६.३५
तिचा प्रश्न ६.७.३५
निःशंक झोप घे तूं १३.७.३५
कधी २८.९.३५
जुनी प्रीत नोव्हेंबर १९३५
सहज भरेल फुलारी अंदाजें १९३५
जरा धीर धर अंदाजें १९३५
तुझ्याच साठी अंदाजें १९३५
प्रेम व चुकी अंदाजें १९३६
देव तुझामाझा १२.२.३६
प्रतीक्षा ३१.३.३६
कधी तरी २.५.३७
अनन्यगतिका ३.१०.३७
प्रेमाचें तत्त्वज्ञान ५.१२.३८
आर्यांचें गाणें १२.३.३९
तर अंदाजें १९४०
सखे ग ऽ! १३.४.४१
आज एकादशी २.७.४४
विसर विसर हृदया २९.८.४५
असा जिवाचा० ७.१०.४५
महात्मा अंदाजें १९४५
शशिवदने अंदाजें १९४५
धीवरी २.१०.४७
येथे अंदाजें १९४७
जग हसलें रे! ९.४.५०
डाव अंदाजें १९५०

अ भि सा...ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे

REFBK-0013475

REFBK-0013475